# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विशेष कक्ष विभाग
## परिपत्रक

सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त शिक्षण संस्था व संकुलांना या परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते की, सोलापूर विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व सेट/नेट परीक्षा देऊ इच्छिणा-या मागासवर्गीय व इतर प्रवर्गातील उमेदवारांसाठी शनिवार दिनांक ०७/०१/२०१७ रोजी मोफत सेट/नेट परीक्षा प्रशिक्षण कार्यशाळा/शिबीर आयोजिले आहे. सदर प्रशिक्षण कार्यशाळा/शिबीराचे उद्घाटन शनिवार दिनांक ०७/०१/२०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता मा. कुलगुरु, डॉ. एन. एन. मालदार यांचे अध्यक्षतेखाली व शुभहस्ते विद्यापीठ सभागृहात होणार आहे.

| तारीख | वेळ | विषय | प्रशिक्षण शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|
| शनिवार दि. ०७/०१/२०१७ | **सकाळ सत्र** स. ११:०० ते १:०० | पेपर क्र. १ | विद्यापीठ सभागृह |
| | **दुपार सत्र** दु. २:०० ते ४:०० | | |

वरीलप्रमाणे सर्व पात्र उमेदवारांना प्रशिक्षण शिबीर खुले असून, प्रशिक्षण शिबीरामध्ये इतर विद्यापीठातील तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी सर्व इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने सकाळी ठिक १०:१५ वाजता उपस्थित राहून, या प्रशिक्षण कार्यशाळा/शिबीराचा लाभ घ्यावा.

**संचालक**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

**जा. क्र. सोविसो/मविविमं/विशेष कक्ष/२०१६-१७/** 11849
**दिनांक :** 31 DEC 2016

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था/विद्यापीठ संकुले,**
**सोलापूर विद्यापीठ,**
**सोलापूर.**

❖ टिप - सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त शिक्षण संस्था व संकुले यांना विनंती की, सदरचे परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.